दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १२२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.१४ डिसेंबर २०२४





## अवैध रेतीउपसा करणाऱ्या १ बार्ज व २ सक्शन पंपवर कारवाई

**दि.१३, ठाणे :** भिवंडी तालुक्यातील कशेळी ते दिवे अंजूर दरम्यानच्या खाडीपात्रामध्ये अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांवर भिवंडी अपर मंडळाधिकारी व तलाठी कार्यालयाने कारवाई करून २ सक्शन पंप बाहेर काढून नष्ट करण्यात आले व १ बार्जला कटरच्या सहाय्याने बुडविण्यात आले. यावेळी जप्त मालमत्तेतील २ सक्शन पंपची किंमत १० लाख व १ बार्ज किंमत ८ लाख अशी एकूण १८ लाख किंमतीची मालमत्ता नष्ट करण्यात आली असून याप्रकरणी नारपोली पोलीस स्थानकात गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही सुरू आहे.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे तसेच भिवंडी उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या आदेशावरून व भिवंडी तहसिलदार अभिजित खोले यांच्या सूचनेनुसार मौजे कशेळी ते दिवे अंजुर या खाडीमध्ये अप्पर मंडळधिकारी भिवंडी, मंडळ अधिकारी खारबाव व मंडळातील अधिनस्त तलाठी खारबाव, कोन, अंजुर व काल्हेर ग्राम महसूल अधिकारी यांच्या पथकाने या खाडीमध्ये अनधिकृतरित्या रेती उपसा करणाऱ्या सक्शन पंप व बार्ज वर आज सकाळी ८ वाजता कार्यवाही केली. यामध्ये भिवंडी तालुक्यातील मौजे आलिमघर येथील खाडीपात्रामध्ये १ बार्ज व २ सक्शन पंप आढळून आले. पथकाची चाहूल लागताच तेथील सक्शन वरील व्यक्ती पसार झाले.

जप्त केलेली मालमत्ता मौजे काल्हेर येथील बंदराच्या किनाऱ्याजवळ आणून २ सक्शन पंप बाहेर काढून नष्ट करण्यात आले व १ बार्जला कटरच्या सहाय्याने छीद्र पाडून मध्यभागी नेवून बुडविण्यात आले.

## लंके परिवार पराभवाने खचणारा नाही - राणीताई लंके

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** विधानसभा निवडणूकीतील पराभवानंतर मी शरद पवार यांची भेट घेतली. त्यांच्या भेटीनंतर काम करण्यासाठी मला नवी उर्जा मिळाली. विधानसभा निवडणूकीत पराभव झाला असला तरी लंके परिवार हा खचून जाणारा नाही. निकालच्या दुसऱ्या दिवसापासून आम्ही कामाला सुरूवात केली. पराभव झाला म्हणून कोणीही खचून जाऊ नका. पराभव मनातून काढून टाका, नव्या उभारीने कामाला सुरूवात करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणी लंके यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खा. शरद पवार यांच्या ८५ वा वाढदिवसानिमित्त खा. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून ५०० गरजू विद्यार्थ्यांना सायकल वितरण, वृध्दांना काठी वाटप करण्यात आले. तसेच नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व चष्मा वाटप करण्यात आले. तसेच नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व चष्मे वाटप मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. येत्या ५ जानेवारीपर्यंत हे शिबिर मतदारसंघाच्या विविध गावांमध्ये घेण्यात येणार आहे. या कार्यक्रमानिमित्त बोलताना राणी लंके यांनी कार्यकर्त्यांना खचून न जाण्याचा सल्ला दिला. यावेळी बाबाजी तरटे, संभाजी रोहोकले, बापू शिर्के, राजेंद्र चौधरी, सुवर्णा धाडगे, पूनम मुंगसे, अशोक रोहोकले, गंगाराम बेलकर, जयसिंग मापारी, अर्जुन भालेकर यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. रवींद्र राजदेव यांनी सूत्रसंचलन केले. गुरुवारी (१२ डिसेंबर) बाभुळवाडे येथे १५३ रुग्णांची तपासणी करण्यात आली. ११८ रुग्णांना चष्म्याचे वितरण करण्यात आले तर ५ रुग्णांचे मोतीबिंदूचे निदान झाले असून त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तर वडझिरे येथे ४५० रुग्णांची नेत्र तपासणी,२८० रुग्णांना चष्मा वितरण करण्यात आले. २२ रुग्णांचे मोतीबिंदूचे निदान झाले असून त्यांच्यावर लवकरच शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

### ईव्हीएममुळे पराभव !

मागील महिन्यात आपल्याला पराभवाला सामोरे जावे लागले. हा आपला पराभव नसून ईव्हीएमने घडवून आणलेला पराभव आहे. गुजरातमधून ईव्हीएम मशिन आणल्याने मोठ - मोठ्या नेत्यांचे खच्चीकरण करण्यात आले. येणारा भविष्यकाळ आपल्यासाठी चांगला असेल.

## कपोते वाहनतळाचा पालिकेने घेतला ताबा !

### केडीएमसीचे १ कोटी ८८ लाख ११ हजार १६८ रुपये थकवले

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१३, कल्याण (ठाणे) :** कल्याण डोंबिवली पालिकेने स्टेशन परिसरातील स्मार्ट सिटी प्रकल्पा अंतर्गत दिलीप कपोते वाहनतळ उभारले आहे. हे वाहनतळ खाजगी कंत्राटदाराला चालविण्यास दिले होते. कंत्राटदराने पालिकेस भरावयची रक्कम थकवली होती. कंत्राटदराने एक कोटी ८८ लाख ११ हजार १६८ रुपये थकविल्याने त्यांच्याकडून वाहनतळाचा ताबा पालिका प्रशासनाने काढून घेतला आहे. आता हे वाहनतळ पालिका कर्मचारी आणि अधिकारी चालविणार असल्याची माहिती उप आयुक्त रमेश मिसाळ यांनी दिली. इमारत सहा मजली आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेचे, कल्याण (प.) रेल्वे स्थानकाजवळील कै.दिलीप कपोते बहुमजली बांधीव वाहनतळ (पे अँड पार्क) या धर्तीवर ३ वर्षे कालावधीकरीता भाडेतत्वावर चालविणेकामी मे.कुमार इन्टरप्रायझेस आणि श्री गुरुदत्त एंटरप्रायझेस (जॉईंट व्हेन्चर) यांना १६/०२/२०२४ पासुन, प्रथम ३ महीन्यांचे भाडे रूपये ९४,०५,५८४/- भरून चालविण्याकरीता देण्यात आले होते.

तथापी दि.१६ मे २४ ते १५ नोव्हेंबर,२४ पर्यंत संबधित कंत्राटदाराने भाडे रक्कम (जीएसटी सह) रु. १,८८,११,१६८/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी अठ्ठयाऐंशी लाख अकरा हजार एकशे अडूसष्ठ मात्र) इतकी थकवली होती. याबाबत मे.कुमार इंटरप्रायझेस आणि श्री गुरुदत्त एंटरप्रायझेस यांनी करारनाम्यातील अट क्रमांक ६ व ८ चा भंग केल्याने त्यांना वेळावेळी नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. तरी देखील मे.कुमार एंटरप्रायझेस आणि श्री गुरुदत्त एंटरप्रायझेस (जॉईंट व्हेन्चर) यांनी थकीत रक्कमेचा भरणा महापालिका फंडात केला नसल्याने, कंत्राटदाराचा करारनामा संपुष्टात आणण्याचा आदेश बजाविण्यात आला आहे.

## 'पुष्पा' च्या अटक प्रकरणी मोठी घडामोड

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.१३, हैदराबाद :** तेलुगू सिनेमांमधील सुपरस्टार अभिनेता अल्लू अर्जुन सध्या पुष्पा २: द रुल या चित्रपटामुळे चर्चेत आहे. ४ डिसेंबर रोजी हैदराबाद येथील संध्या थिएटरमध्ये या चित्रपटाचा प्रिमियर शो ठेवण्यात आला होता. यासाठी अल्लू अर्जुन अचानक संध्या थिएटरमध्ये पोहोचल्यामुळे एकच गोंधळ उडाला. चाहत्यांनी त्याला जवळून पाहण्यासाठी धावाधाव केली. त्यामुळे चेंगराचेंगरीची दुर्घटना घडून त्यात ३५ वर्षीय महिला रेवतीचा मृत्यू झाला होता. तसेच तिचा मुलगाही गंभीर जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान याप्रकरणी अल्लू अर्जूनवर गुन्हा दाखल झाला असून आज त्याला अटकही करण्यात आली. तसेच त्याला १४ दिवसांची कोठडी सुनावल्यानंतर अल्लू अर्जुनने अटकेपासून सुटका मिळविण्यासाठी तेलंगणा उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

दरम्यान आता या प्रकरणी मोठी घडामोड समोर आली आहे. ज्या महिलेचा मृत्यू झाला. त्या महिलेचा पती भास्कर याने माध्यमांशी बोलताना सांगितले की, त्याला अल्लू अर्जुनच्या अटकेची माहिती नाही आणि तो अभिनेत्याच्या विरोधातील सर्व तक्रारी मागे घेण्यास तयार आहे. माध्यमांशी बोलताना भास्करने सांगितले, अल्लू अर्जुनविरोधातील तक्रार मागे घेण्यास मी तयार आहे. चेंगराचेंगरीच्या प्रकरणात अल्लू अर्जुनला अटक झाल्याची मला कल्पना नाही. चेंगराचेंगरीच्या घटनशी अल्लू अर्जुनचा काहीही संबंध नाही.

दरम्यान अल्लू अर्जूनविरोधात एफआयआर दाखल झाल्यानंतर हैदराबाद पोलिसांच्या सेंट्रल झोनचे पोलीस उपायुक्त अक्षांश यादव यांनी द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले की, भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५ (सदोष मनुष्यवधासाठी शिक्षा) नुसार अल्लू अर्जुनवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कलम ११८ (जाणूनबुजून इतरांच इजा पोहोचवणं) याचीही नोंद एफआयआरमध्ये करण्यात आली आहे. चिक्कपडल्ली पोलीस स्थानकात मृत महिलेच्या नातेवाईकांनी या सर्व प्रकाराबाबत तक्रार दाखल केली होती. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा नोंद केला होता.

दरम्यान चेंगराचेंगरीच्या घटनेंतर अभिनेता अल्लू अर्जुनने या दुर्घटनेबद्दल दिलगिरी व्यक्त केली होती. एक्सवर व्हिडीओ पोस्ट करत त्याने म्हटले, संध्या थिएटरमध्ये घडलेली घटना दुर्दैवी असून यात मृत्युमुखी पडलेल्या महिलेच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त करतो. तसेच या कठीण काळात मी त्यांच्याबरोबर आहे. त्यांनी स्वतःला एकाकी समजू नये, मी स्वतः त्यांची भेट घेईल. पुढील खडतर वाटचालीसाठी जी मदत लागेल, ती मी करेन.

## कल्याण गुन्हे शाखेची कारवाई: चोरी झालेल्या मोबाईल, लॅपटॉपसह चोरटे अटकेत

**अक्षराज : भानुदास गायकवाड**




**दि.१३, डोंबिवली (ठाणे) :** कल्याण पूर्व कोळशेवाडी भागात फ्लिपकार्ट हबमधून लाखो रुपयांचे मोबाईल, लॅपटॉप आणि अन्य वस्तू चोरणाऱ्या टोळीला कल्याण गुन्हे शाखा घटक-३ च्या पोलिसांनी पकडले. गुप्त माहितीच्या आधारावर डोंबिवली पूर्वेतील खंबाळपाडा रोड परिसरात कारवाई करण्यात आली व पुढील आरोपी अटक करण्यात आले.

अटक करण्यात आलेले आरोपी: १. प्रणव रविंद्र पांचाळ (वय २५), डोंबिवली पूर्व २. प्रशांत गंगाराम शेलार (वय २५), उल्हासनगर ३. अमित भिमराव राणे (वय ३०), कल्याण पूर्व ४. अजित भिमराव राणे (वय २८), कल्याण पूर्व पोलिसांनी आरोपींना सापळा रचून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ६,३३,६७९ रुपये किमतीचे २३ मोबाईल, २ लॅपटॉप, १ कॅमेरा, इलेक्ट्रीक फॅन आणि विविध कंपन्यांचे एअर बड्स असा एकूण ५० वस्तूंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

चौकशीत आरोपींनी चक्की नाका व कोळशेवाडी परिसरातील फ्लिपकार्ट हबमधून गेल्या तीन महिन्यांत चोऱ्या केल्याची कबुली दिली. चोरण्यात आलेला मुद्देमाल विक्रीसाठी नेला जात होता. कोळशेवाडी पोलीस ठाण्यात या प्रकरणी आधीच गुन्हा दाखल आहे. आरोपींकडून हस्तगत केलेल्या वस्तूंनी या चोरीचा मोठा तपशील समोर आला ही यशस्वी कारवाई अपर पोलीस आयुक्त पंजाबराव उगले, पोलीस उप आयुक्त अमरसिंह जाधव, सहायक पोलीस आयुक्त शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे आणि त्यांच्या पथकाने केली. या प्रकरणातील आरोपींना पुढील तपासासाठी कोळशेवाडी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून तपास चालू आहे.

## जी/दक्षिण विभागात सांघिक कवायत स्पर्धा संपन्न

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.१३, मुंबई :** शारीरिक शिक्षण विभागातर्फे जी/दक्षिण विभागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्रजी महानगरपालिका शाळेच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या सांघिक कवायत स्पर्धा उत्तम प्रकारे पार पडल्या. या स्पर्धेत वरळी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उच्च प्राथमिक इंग्रजी शाळेने तब्बल तीन बक्षिसे पटकावले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दि.१२ व १३ डिसेंबर अशा दोन दिवस शारीरिक शिक्षण विभागातर्फे वरीष्ठ पर्यवेक्षक राजेश गाडगे, पर्यवेक्षक दत्तू लवटे, कनिष्ठ पर्यवेक्षक अंकुशराव बागल यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय अंतिम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संचलन कवायत, फ्रॉलिक्स, लेझीम व फॅन्सी ड्रिल अशा चार प्रकारच्या सांघिक कवायत स्पर्धा घेण्यात आल्या.

जी/दक्षिण विभागातील एकूण सोळा शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेमध्ये पहिल्या दिवशी संचलन कवायत व फ्रॉलिक्स ची स्पर्धा घेण्यात आली. या दोन्ही प्रकारच्या कवायती मध्ये येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर उच्च प्राथमिक इंग्रजी शाळेने उत्कृष्ट प्रदर्शन करत संचलन कवायत स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला तर केशवराव खाडये मार्ग हिंदी शाळेच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. फ्रॉलिक्स स्पर्धेत वरळी नाका हिंदी शाळेच्या मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक तर डॉ बाबासाहेब आंबेडकर इंग्रजी शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला.

तसेच दि १३ रोजी झालेल्या लेझीम स्पर्धेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्रजी शाळेच्या मुलींनी अस्सल मराठी साज घालून अतिशय उत्कृष्ट लेझीमचे सादरीकरण करून उपस्थितांची मने तर जिंकलीच पण उपस्थितांना चालीवर ठेका धरायला भाग पाडले. या लेझीम संघाने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच वरळी नाका हिंदी शाळेच्या मुलींनीही उत्तम लेझीम खेळत द्वितीय क्रमांक पटकावला. दुसऱ्या सत्रात पार पडलेल्या फॅन्सी ड्रिल स्पर्धेत सीताराम मिल मराठी शाळेच्या संघाने प्रथम क्रमांक तर ना.म.जोशी मराठी शाळेच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र, तर शाळेला प्रमाणपत्र आणि आकर्षक ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता श्रीवास्तव, मुख्याध्यापक सुरेश घिगे, शिक्षक सह.बँकेचे संचालक किरण पाटील,वरीष्ठ शिक्षिका सुमित्रा यमगेकर, साधना माने हे मान्यवर उपस्थित होते. जी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांनी या स्पर्धेत विजयी झालेल्या सर्व संघाचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतूक व अभिनंदन केले आहे. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विभागातील शारीरिक शिक्षण शिक्षक रश्मी राणे, दैनिक अक्षराज चे पत्रकार प्रभाकर हजारे, गणेश डहाळे, संजय माने व नितीन येलवे यांनी परिश्रम घेतले.

## परभणी येथील संविधान प्रतिकृती विटंबनेचा निषेध करत बिलोलीत तहसिलवर मोर्चा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**




**दि.१३, नांदेड :** ज्या समाज कंठकाने परभणी शहरातील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासमोर असलेल्या भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड करुन विटबंना केली त्या घटनेच्या निषेधार्थ आज दि.१३ डिसेंबर रोजी बिलोली शहर कडकडीत पणे बंद ठेऊन निषेध मोर्चा तहसिल कार्यालयावर धडकला व तहसिलदार यांना निवेदन देऊन आरोपी विरोधात कडक शिक्षेची मागणी करत निषेध व्यक्त करण्यात आले.

परभणी येथे दि.१० डिसेंबर रोजी ज्या समाजकंठकानी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील संविधान प्रतिकृतीची मोडतोड केली त्या घटनेचा देशात संताप व्यक्त करण्यात येत आसुन आज दि.१३ डिसेंबर रोजी बिलोली येथे बहुजन समाज व संविधान प्रेमी जनतेच्या वतिने त्या घटनेच्या निषेधार्थ बिलोली शहरातील बाजारपेठ बंदची हाक व निषेध मोर्चाचे केलेल्या आव्हानानुसार बिलोली शहरातील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पासुन सुरवात करण्यात आलेल्या जाहीर निषेधार्थाच्या मोर्चेत मोठ्या संख्येनी सहभागी झालेले महिला व पुरुषांनी त्या घटनेच्या निषेधार्थ घोषणाबाजीही देत तहसिल कार्यालयावर सदरचा मोर्चा धडकला.

यावेळी मोर्चेतील अनेक मान्यवरांनी त्या घटनेच्या निषेधार्थ संतप्त भावना व्यक्त करत आरोपी विरुध्द कडक शिक्षेची मागणी करत त्या घटनेचा निषेध व्यक्त करत तहसिलदार गजानन शिंदे यांना निवेदन देण्यात आले तर या वेळी बिलोली शहरांतील व्यापाऱ्यांनी आपापली प्रतिष्ठाने उत्सफुर्तपणे कडकडीत बंद ठेऊन बंदला प्रतिसाद दिले. तर बिलोली पोलीस ठाण्याच्या वतिने पो.नि. अतुल भोसले यानी शहरात सर्वत्र कडेकोट चोख बंदोबस्त ठेऊन हा निषेध मोर्चा व बंद शांततेत पार पाडण्यास सहकार्य केले.

# संपादकीय



## महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज पुण्यतिथी. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काही काळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याच ी त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील.

बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# हार्ड टास्क मास्टर : योगाचार्य अय्यंगार

योगमहर्षी बी.के.एस. तथा बेल्लूर कृष्णम्माचार सुंदरराज अय्यंगार यांचा जन्म दि.१४ डिसेंबर १९१८ रोजी कर्नाटकातील बेल्लूर, जिल्हा कोलार येथे झाला. हा पहिल्या महायुद्धाचा काळ होता. तशात देशभर इंफ्ल्यूएन्झाची भयानक साथ आलेली होती. त्यांच्या वडिलांना बालपणी त्याची लागण झाली. त्याकाळी हा रोग महाभयंकर समजला जाई. तशात त्यांच्या वयाच्या आठव्या वर्षी त्यांचे पितृछत्र हरपले. ते या अय्यंगार कुटुंबातील नववे अपत्य होते. त्यांचे कुटुंब एकंदर अकरा मुलांचे होते. वडिल शालेय शिक्षक होते. त्यावरून घरातील आर्थिक परिस्थिती काय असेल, याची सहज कल्पना येईल. त्यात भरीस भर म्हणजे त्यांना क्षयाची बाधा झाली. त्याकाळी हे दोन्ही आजार राक्षसीच होते. तेव्हा त्यावर औषधोपचार जणू नसल्यातच जमा होते. घरची परिस्थिती आणि साथीचे आजारपण यामुळे त्यावेळी १३-१४ वर्षांचे असलेले योगाचार्य अशक्तपणा, कुपोषणासह औषधोपचारांचा अभाव यामुळे निराशेच्या खोल गर्तेत गेले नसते तरच नवल. त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांचे थोरले मेव्हणे एकदा त्यांच्या घरी आले. त्यांनी या अशक्त व रोगग्रस्तास पाहिले आणि ते म्हणाले, अरे सुंद्रा- सुंदरराज, तू माझ्याबरोबर म्हैसूरला चल.'' त्यांचे नावही कृष्णम्माचारी होते. ते योगोपचार करीत आणि योग शिकवीत. त्यांना आपल्या घरी नेण्यामागे त्यांचा हेतू हा होता, की याला घेऊन जाऊन थोडेफार जुजबी उपचार करावे आणि त्याच्याकडून मुख्यत: घरगडी म्हणून कामे करवून घ्यावीत. ते त्यांच्यासोबत म्हैसूरला गेले व थोरल्या बहिणीकडे राहू लागले. कर्मधर्मसंयोगाने हा कालावधी केवळ सहा-आठ महिन्यांचाच होता. नंतर मेव्हण्यांनी त्यांना धारवाडच्या दौऱ्यावर नेले. त्याकाळचे पुण्याचे सिव्हिल सर्जन व्ही.बी.गोखले हे कृष्णम्मचारींच्या धारवाडच्या या योगवर्गासाठी आले होते. गोखल्यांनी त्यांच्याकडे एका योगशिक्षकाची मागणी केली. सुंदरराजला तेव्हा जुजबी इंग्रजी येत असल्याने त्यांनी गोखल्यांच्या विनंतीनुसार पुण्यास पाठविले.

इ.स.१९३८साली पुण्यातले घरभाडे योगप्रशिक्षकांना परवडणारे नव्हते. पुणे कॅम्प परिसरात एका भुताने पछाडलेल्या घरात भाडेकरू मिळत नसल्याने ते त्यांना किरकोळ भाड्याने मिळाले. लग्नाआधी अनेक वेळा पूर्ण दिवस त्यांना कॉफी व पाण्यावर काढावा लागले. सन१९४२ साली जेव्हा त्यांनी संसार थाटला, तेव्हा तर मेहनतीला मर्यादाच उरली नव्हती. पण तरीही त्यांनी योगविद्येचा सराव सोडला नाही. शरीराला वेदना व थकवा जाणवत होता. अशा वेळी आपल्या मुलांकडून ते हात, पाय, कंबर आदी दाबून घेत असत. सन १९५१ ते १९६६ सालापर्यंत योगविद्या शिकविण्यास निरनिराळ्या ठिकाणच्या दौऱ्यांमध्ये जेवणाचे अतिशय हाल होत असत. त्या महिना-दोन महिन्यात त्यांचे वजन १५ ते २० पौंड कमी झालेले असे. पुण्यात योगविद्या शिकवायची म्हटल्यावर त्यांनी स्वत:चीच शागिर्दी पत्करली. स्वयं योगशिक्षण, त्यासंबंधीचे स्वतंत्र प्रयोग व शिकविणे सुरू झाले. योगाद्वारे त्यांनी स्वत:च स्वत:वर उपचार करून रोगांना पिटाळून लावले होते. योगाचे लोकाभिमुख आणि लोकोपयोगी अंग विकसित करून त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवहार्य योग



**– संकलन व सुलेखन –**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

शिकविला. रोगोपचार, आरोग्य आणि स्वास्थ्य लोकांपर्यंत पोहोचविणे हा हेतू त्यामागे होता. हे काम व्यापक पातळीवर पोहोचविण्याच्या उद्देशाने त्यांनी योगाच्या प्रचार-प्रसारार्थ अनेक विद्यार्थी जगभर घडवले. त्यातून योगविद्या जगभर झपाट्याने पसरली. त्यांचा प्रथम ग्रंथ 'योगदीपिका' हा याकामी मोलाचा दुवा ठरला. त्यांनी दुसरी वाहिनी हाताळली ती अशी- त्यांनी योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेवर अभूतपूर्व प्रभुत्व मिळवले होते. त्यांच्या पुस्तकांतील छायाचित्रांतून याची प्रचीती येते. त्यांनी योगासने कलेच्या अंगाने पेश केली. त्यांची योग-प्रात्यक्षिके म्हणजे एक अत्युच्च कलाविष्कार असे. त्यांना योगातील मायकेल ॲन्जेलो अशी ख्याती युरोपात प्राप्त झाली होती. एखादा कवी काव्य करतो किंवा गायक बंदिशी बसवतो व पेश करतो तसे ते आसन संचलन करून लोकांना एका अनोख्या कलाविष्काराचा आनंद देत असत. त्यांच्या अप्रतिम योग-कलाविष्काराच्या अनेक ध्वनिचित्रफिती उपलब्ध आहेत. तिसरी वाहिनी म्हणजे ते स्वत: जी योगसाधना करत ती एक तत्त्वसाधना होती. ती निरपेक्ष, निर्हेतुक असे. योग-तत्त्वज्ञान जगणे व श्वासणे हा त्यामागे उद्देश असे. पतंजली योगसूत्रांच्या कोंदणात त्यांची ही साधना बसविलेली होती. ते म्हणत, आपण स्वत:मध्ये काय करतो ते जाणा. स्वत:लाच प्रश्नोत्तरे करा. हे शिकवता येत नाही, पण शिकता येते. हा दिव्य अनुभव दाखवता वा पाहता येत नाही. त्याचा केवळ बोधच होऊ शकतो. मी जेव्हा योगसाधना शिकवतो तेव्हा वैज्ञानिक असतो. जेव्हा ती पेश करतो तेव्हा कलाकार असतो. पण स्वत: जेव्हा ही साधना करतो तेव्हा तिचा मी एक निरपेक्ष उपासक असतो, पूजक असतो, अनुष्ठाता असतो. ते अनुष्ठान असते. अशा प्रकारे त्यांची योगप्रणाली त्रिमुखी होती. त्यांचे जगभरातील विद्यार्थी हा त्रिमुखी योग होय.

योगा प्रशिक्षक अय्यंगार यांच्या मागचे दुर्भिक्ष्य संपले ते सन १९४३-४४ सालानंतरच. तोपर्यंत त्यांनी पुण्यात स्थिरस्थावर होत आपल्या योगविद्येच्या आधारावर जम बसवला होता. त्यांची आर्थिक विवंचनाही काहीशी कमी झाली होती. वयाच्या पस्तिशीनंतर तर आर्थिक संपन्नताही आली. योगासने-प्राणायामाने त्यांना केवळ स्वास्थ्य व आरोग्यच प्राप्त झाले नाही, तर दहा माणसांचे बळ, सामर्थ्य आणि उत्साह त्यांच्यात संचारले होते. त्यानंतर ६० वर्ष्यांत त्यांनी इतके प्रचंड कार्य केले की सामान्य माणूस तीन-चार जन्मांतही तितके कार्य करू शकले नसते. या वाटचालीत जगभरात जवळपास १२५ ते १५० अय्यंगार योग संस्था सुरू केल्या. हा सगळा विश्वव्यापी पसारा त्यांनी लीलया सांभाळला होता. सुमारे दहा लाख जणांना त्यांनी योगदीक्षा दिली. परोक्ष-अपरोक्ष ६०-७० लाख विद्यार्थी घडवले. जागतिक स्तरावर योगशिक्षणाचे संपूर्णपणे एकहाती व्यवस्थापन करून त्यांनी चमत्कारच घडवला होता. ५५-५६व्या वर्षी त्यांच्या शारीरिक क्षमतेबद्दल युरोपातील डॉक्टरांनी आश्चर्य व्यक्त कले. त्यांच्या काही वैद्यकीय चाचण्याही केल्या. त्यांची फुफ्फुस क्षमता १८-२० वर्षांच्या ॲथलीटला लाजवील अशी होती. पूर्वायुष्यात त्यांना फुफ्फुसांचा क्षय झाला होता. हे आपल्याला अविश्वसनीय वाटत असल्याचे या डॉक्टरांनी कबूल केले. त्यांच्या बाबतीत दुसरी अविश्वसनीय वाटावी अशी गोष्ट म्हणजे मृत्यूच्या वेळेखेरीज ते कधीही हॉस्पिटलची पायरी चढले नव्हते. अनेकांना वाटे की त्यांना ही शरीरसंपदा, स्वास्थ्य, आरोग्य आणि सामर्थ्य हे योगासने व प्राणायामाने प्राप्त झाले होते. मात्र याबाबतीत ते म्हणत असत, योगासने-प्राणायामाचे स्वास्थ्य व आरोग्य हे अवांतर फळ असते. योगसाधना ही आरोग्यासाठी नसते, तर त्यातून जीवनामृत मिळते. जे ज्ञान-विज्ञानस्वरूप आणि आत्मानंद स्वरूप असते. या सगळ्या गोष्टींचे फलित म्हणजे स्वास्थ्य, आरोग्य, बल व सामर्थ्य होय. या बाह्य रंगाला भुलून जायचे नसते. योगाचे प्रधान फळ म्हणजे आध्यात्मिक बल होय!

अय्यंगार गुरुजींचा भारी पगडा संपूर्ण समाजावर होता. बालक-किशोरांपासून सर्व सामाजिक-आर्थिक स्तरांतील लोक, आस्तिक-नास्तिक, बुद्धिवादी-भाववादी अशा सगळ्यांना भावेल, रुचेल, पचेल अशा प्रकारे ते योगविद्या शिकवीत. ते अष्टपैलू योग मार्गदर्शक होते आणि त्यातील प्रत्येक पैलूमध्ये ते एकमेवाद्वितीय होते. त्यांचे विद्यार्थी त्यांना हार्ड टास्क मास्टर म्हणून ओळखत. पण ते तेवढेच आणि तसेच नव्हते. येहुदी मेनुहिनसारख्या कलाकाराला ते अत्यंत हळुवारपणे शिकवीत. अशा योगविद्या प्रशिक्षकांनी दि.२० ऑगस्ट २०१४ रोजी आपला देह ठेवला.

**!! जयंतीनिमित्त त्यांना शतकोटी विनम्र अभिवादन !!**

## गुरूचरित्र..

बावन्न श्लोकी कुंभ
करा सुखे सुधा पान
गुरूचरित्र वाचताना
मनस्वच्छ आरस्पान

शुचिर्भूतताअंतर्बाह्य
चारित्र्याचे ठेवा भान
पावित्र्य नांदो वर्तनी
विसरा पूर्ण देहभान

नियंत्रण श्वासावरती
स्पष्ट उच्चारी जबान
जाणून घेता शब्दार्थ
अनुभूती देई लुभान

प्रयत्ने येई एकाग्रता
भरकटू नये ते ध्यान
गुरूमुर्ती यति प्रतिमा
सश्रध्दे करे अधिष्ठान

मनीसाठवे दत्त मुर्ती
सहज लाभे अंतर्धान
रोग पिडा सर्व व्याधी
पावूनजाती अंतर्धान

हुसकावू लावे बाहेर
षड्रिपुंचा महा हैवान
गुरूराज नामस्मरणे
शांतवी विचारथैमान

संपन्नहोता पारायण
जरुर करा अन्न दान
यथाशक्ती देत रहावे
घासातलेघासनिदान

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# डहाणू आदिवासी आश्रम शाळा प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात...

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१३, डहाणू (पालघर) :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन ११ ते १३ डिसेंबर या कालावधीत आश्रम शाळा सवणे येथे करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन डहाणू मतदार संघांचे आमदार विनोद निकोले डहाणू सभापती पंचायत समिती प्रवीण गवळी यांच्या हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, डहाणुचे मा. सत्यम गांधी (भा.प्र.से.) यांनी खेळाडू विद्यार्थ्या खेळाचे व शिक्षणाचे महत्त्व विशद केले. त्यानंतर प्रवीण गवळी यांनी खेळाचे महत्त्व खानुभवातून सांगितले. तसेच मा. विनोद निकोले यांनी खेळाडूंच्या जिद-चिकारीचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत सवणे, कळमदेवी, रणकोळ, ऐंबुर, लवा, खंबाळे, डोंगारी नंडोरे या आठ केंद्रातील एकूण २१०० खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यास्पर्धेत कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, हॅण्डबॉल, रिले तसेच गोळाफेक, भालाफेक, थाळीफेक, लांब उडी, उंचउडी, धावणे क्रीडाप्रकारांचा समावेश आहे. कार्यक्रमास प्रकल्प कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रकल्प अधिकारी मधुकर जागले गट शिक्षण विस्तार अधिकारी सर्व शाळांचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, पंच, गुणलेखक, क्रीडाप्रेमी ग्रामस्थ रामव्यवस्थापन समितीतील पदाधिकारी उपस्थित होते. प्रकल्प क्रीडा स्पर्धा उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरुण शेटे, सूत्रसंचालन श्वेता पाटील आणि आभार श्रेणिक पाटील यांनी केले.

# समाजसेवक राजू विश्वकर्माच्या आमरण उपोषणाचा ५वा दिवस




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**


**दि.१३, मिरा भाईंदर :** मिरा भाईंदर शहरातील फाईट फॉर राईट संस्थेचे सचिव व समाजसेवक राजू विश्वकर्मा लोकहितासाठी आमरण उपोषणास गेली ५ दिवस झालेत बसले आहे. अक्षराज पत्रकार म्हणून ह्यांची उपोषण स्थळी दिनांक १३.१२.२०२४ रोजी सकाळी ११ वा. भेट घेत ली व त्यांच्याकडून उपोषणास बसण्याचे कारणे ऐकून घेतली.

५ दिवस झाले उपोषणास पण मिरा भाईंदर कडून कोणताही प्रमुख अधिकाऱ्यानी भेटण्याची सादी तसदी देखील घेतली नाही. सदर क्षविषय लोकहिताचे आहेत खाजगी शाळेची मनमानी, खाजगी रुग्णालयाची मनमानी सार्वजनिक बांधकाम विभागातील गैर कारभार, मिरा भाईंदर महापालिका नगर पालिकेचे प्रशासनाची लापरवाही, घनकचरा विभागात ही त्यांची कामे नीट करत नाही अश्या अनेक तक्रारी येतात. पाणी ही नियमित येत नाही. ह्या जबाबदार फक्त आयुक्त काटकर साहेब आहेत असे विधान उपोषणकर्ता राजू विश्वकर्मा ह्यांनी सांगितले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## सकल मराठा समाज बांधवाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१३, पालम (परभणी) :** केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हात्येच्या निषेधार्थ व परभणी येथील संविधान प्रतिकृती अवमाना च्या निषेधार्थ शुक्रवार, दि.१३ डिसेंबर २०२४ रोजी सकल मराठा समाज समन्वय समितीतर्फे तहसीलदारा मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात केज तालुक्यातील मस्साजोग येथील मराठा सेवक व सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी अपहरण करून त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. सदरील घटना अत्यंत गंभीर असून या घटनेने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून या घटनेचा सकल मराठा समाजाच्या वतीने तीव्र स्वरूपात निषेध करण्यात आला. तसेच यांच्या हत्येचा तपास सीआयडीमार्फत करून प्रकरणातील दोषी विरोधात खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना लवकरात लवकर फाशीची शिक्षा द्यावी. तसेच परभणी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारका जवळील संविधान प्रतिकृतीचा अवमान करणाऱ्या आरोपीची सखोल चौकशी करून त्यामागील खरा मास्टर माईंड कोण आहे हे तपासांअंति सिद्ध करून आरोपींना कठोर शिक्षा करावी. अशी मागणी करत वरील दोन्ही प्रकरणातील आरोपीवर योग्य ती कार्यवाही करून कठोर शिक्षा देण्यात यावी. अन्यथा या प्रकरणी भविष्यात तीव्र आंदोलन करावे लागेल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी पालम येथील सकल मराठा समाज बांधव व समन्वय समितीचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा उद्धाटन सोहळा संपन्न



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१३, जव्हार (पालघर) :** पंचायत समिती जव्हार व जिल्हा परिषद पालघर यांच्यामार्फत व जिल्हा परिषद योजनेअंतर्गत ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा उद्धाटन सोहळा शुक्रवार, दिनांक १३ डिसेंबर रोजी भरती विद्यापीठ शैक्षणीक संकुल जव्हार येथे पालघर जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम व नानिर्वाचीत आमदार हरिश्चंद्र भोये यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये घेण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षा व उद्धाटन जव्हार पंचायत समितीच्या सभापती विजयाताई लहारे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर विज्ञान प्रदर्शनाच्या उद्धाटन प्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम व् आमदार भोये यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थित सर्व शिक्षक बांधवाना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर विज्ञान प्रदर्शनाच्या वर्गाचे उद्धाटन करून भाग घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जवळ जाऊन आपल्या बोली भाषेत संवाद साधून विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून प्रदर्शन मांडलेल्या विद्यार्थ्यांना बोलते केले. जव्हार सारख्या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनी खूपच सुंदर असे प्रयोग सादरीकरण केले होते.

सदर विज्ञान प्रदर्शनामध्ये जव्हार तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, इंग्लिश मिडियम स्कुल, आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून सेंद्रिय शेती, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बरोबर विविध विज्ञान व तंत्रज्ञान यांची सांगड, गणित जादू, विज्ञानाचे विविध प्रयोग सादर केले. सदर कार्यक्रमाच्या उद्धाटन प्रसंगी उपसभापती दिलीप पाडवी, गटविकास अधिकारी दत्तात्रय चित्ते, शिक्षण विभाग अधिकारी वर्ग उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सदर विज्ञान प्रदर्शनाला जव्हार तालुक्यातील विविध शाळा, कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी भेट देऊन ५२ वे विज्ञान प्रदर्शन समजून घेतले. सदर कार्यक्रम ाकरीता सर्व विस्तार अधिकारी शिक्षण, गटसमन्वयक,सर्व केंद्रप्रमुख, अध्यक्ष तालुका समन्वय समिती, अध्यक्ष सर्व तालुका शिक्षक संघटना, सर्व मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक व सर्व शिक्षक वृंद, कार्यालयीन कर्मचारी, समग्र शिक्षा अभियान कर्मचारी, सर्व शिक्षक वृंद इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नगरपंचायतीवर खालापुरकर धडकले; मालमत्ता करवाढ विरोधात ठिय्या आंदोलन




**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.१३, खालापूर :** खालापुर नगर पंचायतीच्या मालमत्ता करातील वाढीविरोधात शुक्रवार, दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजी मोठ्या संख्येने खालापूर नगरपंचायत हद्दीतील नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करत मासिक बैठकीत प्रस्तावित करवाढ रद्द करण्याचा ठराव समंत करण्यास भाग पाडले. मालमत्ता करात भरमसाठ वाढीचा प्रस्ताव खालापुर नगरपंचायतीने घेत प्रस्तावित कराबाबत नोटीस देण्यात आल्या होत्या. नोटीस बजावताना त्यामध्ये पुढील ५ वर्षात होणारी करवाढ चुकीच्या पद्धतीने असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आल्यानंतर रोष वाढला होता. दिनांक १३ डिसेंबर रोजी नगर पंचायतीची मासिक बैठकीच्या पुर्वीच माहिती नागरिकांना मिळाली होती. या बैठकीच्याकरवाढीवर फैसला व्हावा. यासाठी नागरिकांनी शुक्रवारची वेळ निवडत हे आंदोलन केले. मासिक बैठकीत विषय पत्रिकेवर मालमत्ता करवाढ संदर्भात चर्चा करण्यात येणार असल्याचे उपनगराध्यक्ष संतोष जंगम यांनी जमलेल्या नागरिकांना सांगितल्यानंतर मासिक बैठक सुरू झाली. कोणत्याही परिस्थितीत मालमत्ता करवाढ नागरिकांवर लादली जाऊ नये यासाठी नागरिक कार्यालयाबाहेर संताप व्यक्त करीत होते. विषय पत्रिकेवर मालमत्ता करवाढ संदर्भात ठोस निर्णय घ्या, अन्यथा नगर पंचायत बरखास्त करा, अशी मागणीच नागरिक बाहेरून करीत होते. नागरिकांच्या उग्र भावना लक्षात घेऊन मासिक बैठकीत मालमत्ता करवाढीला एकमताने विरोध असल्याचा ठराव घेण्यात आला. मोठ्या संख्येने नागरिक नगर पंचायत कार्यालयाबाहेर जमले होते. यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. पाण्याची प्रचंड समस्या असताना महिला वर्गांच्या डोक्यावर हंडा उतरलेला नसताना देखील पाणीपट्टी दुप्पट केली आणि आता मालमत्ता कर भरमसाठ वाढविता त्यापेक्षा आमची ग्रामपंचायत बरी होती, असा सूर महिलांनी काढला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# तीव्र चढाव अरुंद घाट माथेरान मिनी बससाठी ठरते डोकेदुखी



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१३, माथेरान :** माथेरान मिनी बसचे स्वप्न सन २००८ ला पूर्ण होत असताना अनेक संघर्षाचे एक कहाणी सर्वांना ठाऊक आहे मिनी बस सूरू होऊन १६ वर्षे उमटले तरी मिनी बसचे रडगाणे केवळ घाटातील अरुंध वळणे हेच मोठे डोकेदुखी ठरत आहे. सर्वसाम ान्य लोकांना स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाची हमी असणाऱ्या मिनी बस जुन्या झाल्याने अनेकदा घाट रस्त्यात बंद पडण्याच्या घटना घडत असतात त्यामुळे प्रवाशांना नाहक मानसिक आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते.

काही महिन्यापूर्वी नविन मिनी बस खरेदीसाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी तत्कालीन पालकमंत्री उदय सामंत याच्या दालनात बैठक आयोजित केली होती. त्यावेळी जिल्हा नियोजन मंडळातून निधी देण्याचे तत्त्व मंजुरी दिली होती , तसा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना निवासी जिल्हाधिकारी रायगड योगेश म्हसे यांना दिल्या होत्या परंतु त्याचं दरम्यान निवडणुका जाहीर झाल्या त्यामुळे मिनी बस मात्र कागदोपत्री राहिली.

१० सप्टेंबर रोजी मनोज खेडकर, शिवाजी शिंदे, सुनिल शिंदे यांनी निवासी जिल्हाधिकारी संदीप शिर्के यांची भेट घेऊन माथेरान करिता तातडीने नवीन मिडी सेवा उपलब्ध करून देण्याची निकड लक्षात आणून दिली. त्यानुसार महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी अशोक लेलँड कंपनीच्या बसची चाचणी घाटात घेतली. परंतु सदर बसची लांबी जास्त असल्याने ती बस घाटात नापास झाली. घाटामध्ये ९ मीटर आणि त्यापेक्षा कमी लांबीची व जास्त इंजिन क्षमतेची बस आवश्यक आहे. हे महामंडळ अधिकाऱ्यांना मनोज खेडकर यांनी सांगून ३२ सीटर आयशर कंपनीच्या कमी लांबीच्या बस ची मागणी केली. सध्या महामंडळाकडे नविन ई बस उपलब्ध आहेत. परंतु माथेरानमध्ये ही बस चार्जिंग पॉइंट नसल्याकारणाने या बस चालू करू शकत नाही.

सध्या महामंडळाकडे असलेल्या ई-बस चालू करण्यास महामंडळ तयार आहे. त्या संदर्भातच आज म हामंडळाच्या उपव्यवस्थापक यामिनी जोशी नियंत्रण समिती क्रमांक १ व दीपक भोडे विभाग नियंत्रक तसेच माने यंत्र अभियंता, त्यांचे सहकारी यांनी म ाथेरान मद्ये येऊन घाट रस्ता व जागेची पाहणी केली व माथेरान नगरपरिषद मुख्याधिकारी राहुल इंगळे यांची भेट घेऊन माथेरानमध्ये मिनी बस चार्जिंग पॉइंट जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली त्या संदर्भात मुख्याधिकारी मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी सकारात्मक चर्चा करून महामंडळाचा प्रस्ताव आल्यानंतर विचार करण्यात येईल असे आश्वासक उत्तर महामंडळाच्या उप विभागीय अभियंताना यामिनी जोशी यांना देण्यात आले. त्यामुळे आता महामंडळ नगरपालिकेकडे कधी प्रस्ताव देते. यावरच माथेरानची नवीन ई मिनीबस सुरू होण्याचे आशा अवलंबून आहेत. तो पर्यंत आहे त्याचं मिनी बस मधून प्रवास करतांना मानसिक आर्थिक त्रासाची तयारी ठेवूनच प्रवास करावा लागेल यात शंका नाही.

## कळंब उपविभागीय अधिकाऱ्यांच्या मार्फत परभणी घटने प्रकरणी मुख्यमंत्र्यांना निषेधाचे निवेदन


**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१३, कळंब (धाराशिव) :** कळंब येथे उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना परभणी येथे झालेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्म ारकाजवळ जातीवादी विकृतीने केलेल्या अमानुष कृत्तीबद्दल जाहीर निषेधाचे निवेदन लोकजनशक्ती पार्टी व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गटाच्या) वतीने देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, परभणी येथे झालेल्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळ संविधान शिल्पाची तोडफोड जातीवादी प्रवृतीने केलेली असल्याने सदरील कृत्याचा जाहीर निषेध करण्यात आलेला आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा स्म ारकाजवळ एका व्यक्तीने संविधानाच्या शिल्प प्रतीची विटंबना केली. त्याबद्दल अशा नराधमाला कठोर अशी शिक्षा झाली पाहिजे.

संविधानाबद्दल अशा पद्धतीने अवमान करणाऱ्या व्यक्तीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच महाराष्ट्रातील महाम ानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ज्या ठिकाणी पुतळे आहेत, त्या ठिकाणी सुरक्षा वाढविण्यात यावी. अशी मागणी लोक जनशक्ती पार्टी व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गटाच्या) वतीने करण्यात आली आहे.

मागणी मान्य न झाल्यास आंदोलन करण्यात येईल असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. यावेळी लोक जनशक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष महावीर गायकवाड,




जिल्हा निरीक्षक निवृत्ती हौसलमल, तालुका अध्यक्ष सुशील वाघमारे, देविदास कांबळे ,भारत कदम, गौतम हजारे, मुकेश गायकवाड, नागेश धिरे, प्रभू गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब टोपे, मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत पाटुळे यावेळी उपस्थित होते.

## टाकळी ढोकेश्वरच्या शेळके यांच्या चित्राची राज्य प्रदर्शनासाठी निवड

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र राज्य कला संचालनालय मुंबई यांचेतर्फे २०२५ यावर्षी घेण्यात येणाऱ्या ६४ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनासाठी रेखाकला व रंगकला या कलाकार विभागात टाकळी ढोकेश्वर येथील युवा चित्रकार नारायण शेळके यांच्या 'द स्ट्रीट' या निसर्गचित्र कलाकृतीची महाराष्ट्र राज्यातून चौथ्यांदा निवड झाली आहे.

हे प्रदर्शन मुंबईच्या जगप्रसिद्ध जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये होणार आहे. चित्रकार शेळके हे टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर विद्यालयात कला शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. निसर्गचित्र हा प्रकार



कुठल्याही महाविद्यालयात शिकवला जात नाही. शालेय जीवनापासूनच निसर्ग सानिध्यात जाऊन निसर्ग चित्र चितारण्याचा छंद चित्रकार शेळके यांना लागला. त्यांची रंगसंगती वेधक दृष्टी देते. त्यांनी कला क्षेत्रातील सर्वोच्च पदवी महाराष्ट्र राज्यातून दहावा क्रमांक मिळवून प्रथम श्रेणीत प्राप्त केली आहे. त्यांच्या चित्रांची ६४ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनासाठी सलग चौथ्यांदा निवड झाल्याबद्दल सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहे. हे प्रदर्शन मुंबईच्या जगप्रसिद्ध जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये होणार आहे. त्यांच्या पुढील कला प्रवासासाठी तमाम चित्रकला प्रेमींकडून अभिनंदन केले जात आहे. राष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कार शालेय जीवनापासूनच निसर्ग सानिध्यात जाऊन चित्र चितारण्याचा छंद शेळके यांना लागला व ते सतत निसर्गाच्या चित्रणात स्वतः ला समृद्ध करत राहिले. त्यांनी निसर्ग चित्र तयार करण्याचे स्वतः चे कला शास्त्र विकसित केले. त्यांची अनेक कला प्रदर्शने भारतात व विदेशात झाली असून त्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अनेक सन्मान व पुरस्कार मिळाले आहेत.

## नववर्षात मुंबईकरांना सरकारचे मोठे गिफ्ट

### तब्बल ४० मिनिटांचा प्रवास होणार १५ मिनिटात...?

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१३, मुंबई :** मुंबईतील पायाभूत सेवा मजबूत करण्याचे काम गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर झाले आहे. मुंबईत लोकल सेवेनंतर मेट्रो प्रकल्पाचे जाळे तयार करण्याचे काम सुरु आहे. तसेच रस्ते मार्ग अधिक मजबूत करण्या कडेही पावले उचलली आहे. त्यासाठीच सागरी किनारा मार्गावरील (कोस्टल रोड) तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. आता हाजी अली ज्यूस सेंटर ते वरळी नाक्यापर्यंत आंतरबदल मार्गिका क्रमांक २ दोन दिवसांपूर्वी मुंबई महापालिकेने सुरू केली.

त्यामुळे या रोडवरील हाजी अली ते वांद्रे-वरळी सीलिंक दरम्यानच्या ८ पैकी ६ आंतर. बदल मार्गिका सुरू झाल्या आहेत. त्यामुळे मुंबईकरांचा प्रवासाचा वेळ वाचणार आहे. अगदी ४० मिनिटांचा प्रवास १० ते १५ मिनिटांत होणार आहे. दरम्यान कोस्टल रोडच्या कामास गेल्या काही दिवसांत विलंब झाला होता. आता त्या कामाला आता गती मिळाली आहे.

कोस्टल रोडच्या उर्वरित दोन मार्गिका देखील लवकरच सुरू करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. कोस्टल रोडचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. राहिलेली कामे म्हणजे कॉंक्रिटीकरण, विद्युत खांबाची उभारणी यासह इतर तांत्रिक कामे दोन आठवड्यात पूर्ण होतील. येत्या जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्या पर्यंत अंतिम टप्पा सेवेत आणण्याचा प्रयत्न म हानगरपालिकेचा आहे.

या कोस्टल रोडला छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव देण्यात आले आहे. तसेच संपूर्ण रस्ता टोलमुक्त असणार आहे. कोस्टल रोड प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते वांद्रे-वरळी सी लिंकच्या वरळी टोकापर्यंत बांधण्यात



येत आहे. यात अनेक ठिकाणी आंतर बदल मार्गिका देण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना वळसा न घालता इच्छित स्थळी पोहोचता येईल. महत्वाचे म्हणजे या कोस्टल रोडला अवजड वाहनांना बंदी असणार आहे. त्यामुळे या ठिकाणी ट्रेलर, मिक्सर, ट्रॅक्टर, अवजड वाहने आणि मालवाहतुकीस बंदी असणार आहे. परंतु बेस्ट आणि एसटी बसेस किंवा खासगी प्रवासी वाहतूक करणारी वाहनांना प्रवेश असणार आहे.

## तालुका विधी सेवा समितीकरिता मुलांसाठी कायदेशीर सेवा युनिट स्थापन

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१३, सुपा (अहिल्यानगर) :** मुलांसाठी अनुकूल कायदेशीर सेवा योजना, २०२४ ची अंमलबजावणीच्या अनुशंगाने मुलांसाठी कायदेशीर सेवा युनिट स्थापन करण्याबाबत मा. राज्यविधी, सेग प्राधिकरण, मुंबई यांचेकडून निर्देश प्राप्त झालेले आहेत त्यानुसार पारनेर पारनेर तालुक्यासाठी ॲड. आर.एस. गायकवाड यांची पॅनल विधीज्ञ तसेच ॲड. रविराज मोहन साबळे आणि शैलेश साळवे यांची विधी स्वयंसेवक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. या समितीच्या माध्यमातून तालुक्यातील विधीसंघर्ष बालके, अल्पवयीन अत्याचार, बालगुन्हेगारी सारख्या कृत्यांपासुन बालकांचे संरक्षण करणे तसेच त्यांना मोफत विधीक सहाय्य प्रदान करून, त्यांचे समुपदेशन करणे, त्यांचे पुनर्वसन करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करून घेणे यासाठी ही समिती कार्यरत असेल. विधीक सहाय्यतेसाठी तालुका सेवा समितीकडे संपर्क साधण्याचे आवाहन या समिती मार्फत करण्यात येत आहे.


# अहिल्यानगर येथे ४ दिवसीय सावित्री ज्योती महोत्सवाचे आयोजन

## विविध कार्यक्रमासह विविध उपक्रमांची रेलचेल, बचत गटांना सहभागी होण्याचे आवाहन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहिल्यानगर :** बचत गटातील महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, युवकांच्या कला-गुणांना चालना देण्यासाठी व विविध कार्यक्रमासह सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचा समावेश असलेल्या ४ दिवसीय सावित्री ज्योती महोत्सवाचे शहरात आयोजन करण्यात आले आहे. बचत गट स्टॉल वस्तू विक्री प्रदर्शन सावेडी येथील गुलमोहर रोड, कोहिनूर मंगल कार्यालयात ९ ते १२ जानेवारी येथे घेण्यात येणार आहे.

मागील वर्षीच्या कोट्यवधी रुपयांची उलाढाल नंतर जिल्ह्यासह राज्यातून बचत गटांचे स्टॉल यामध्ये सहभागी होणार आहेत. दरवर्षी शासनाच्या विविध विभागाला सोबत घेऊन महोत्सव साजरा केला जात असून या महोत्सवाचे हे नववे वर्ष आहे. राज्यभरात विविध वस्तूंचे स्टॉल्स व खाद्यपदार्थांचे स्टॉल्स दरवर्षी यामध्ये सहभागी होत असतात.



या महोत्सवांमध्ये मोफत आरोग्य शिबीर, रक्तदान शिबिर, दंत तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, सर्व जातीय वधू वर मेळावे, वक्तृत्व, नृत्य, चित्रकला उखाणा, भजन, हस्ताक्षर स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक संस्थांना मार्गदर्शन, बेटी बचाव बेटी पढाव अभियान, सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर व्याख्यान, युवा सप्ताह, स्वामी विवेकानंद जयंती, सावित्री ज्योती गौरव पुरस्कार, कवी संमेलन, लोककला सादरीकरण असा भरगच्च कार्यक्रमाचे या महोत्सवामध्ये नियोजन करण्यात आले असल्याची माहिती महोत्सवाचे संयोजक अॅड.महेश शिंदे व पोपट बनकर यांनी दिली.

महोत्सवाच्या संयोजनामध्ये जयश्री शिंदे, राजकुमार चिंतामणी, आरती शिंदे, अॅड.पुष्पा जेजुरकर, अॅड. प्रणाली चव्हाण, दिनेश शिंदे, सुहास सोनवणे, भिमराव उल्हारे, गणेश बनकर, रावसाहेब मगर, राजेंद्र उदागे, मीना म्हसे, रावसाहेब काळे, सुनील मतकर, रजनी ताठे, कांचन लद्दे, अश्विनी वाघ, अनिल साळवे, इसाबाई शेख, अशोक कासार आदी समिती सदस्य प्रयत्नशील आहेत.

या महोत्सवात सहभागी होण्यासाठी बचत गट स्टॉल धारकांनी जुन्या कोर्टाच्या पाठीमागे टांगे गल्ली, पावन गणपती मंदिरा शेजारी संस्थेच्या कार्यालयात नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी ९९२१८१००९६ व ९६५७५११८६९ या क्रमांकावर संपर्क साधावा असे म्हटले आहे.

# भोगटे परिवाराकडून माथेरान सह्याद्री रेस्क्यू टीमला एक लाखाची मदत

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१३, माथेरान :** माथेरान मध्ये जुलै महिन्यात लुईसा पॉईंटच्या दरीत माथेरानमध्ये फिरावयास आलेल्या भोगटे दाम्पत्याचे शव सापडले होते. दोन दिवसांच्या अथक परिश्रमानंतर सह्याद्री रेस्क्यू टीमने रात्री उशिरा त्यांचे शव दरीतून बाहेर काढले होते.

सह्याद्री रेस्क्यू टीमच्या निस्वार्थी कामाची दखल घेत त्याच्या भरीव योगदानाबद्दल त्यांना माथेरान पोलीस ठाण्यात छोटेखानी कार्यक्रमात त्यांना एक लाखाचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. ११ जुलै रोजी पार्थ भोगटे (वय ४६) व श्रीलक्ष्मी भोगटे (वय ४६) राहणार राजापूर, रत्नागिरी येथील दाम्पत्य माथेरानमध्ये फिरण्यास आले होते. ते ब्राईट लँड हॉटेल पासून इको पॉइंटच्या दिशेने गेले होते ते पुन्हा हॉटेलमध्ये आले नाही.

दिनांक १४ जुलै ला रुद्राक्ष भोगटे हे माथेरानमध्ये येऊन पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली होती. त्याअनुषंगाने माथेरान पोलीस ठाण्याकडून माथेरानमध्ये सर्वत्र तपास करण्यात आला. सोशल मीडियाद्वारे सुद्धा तपास करण्यात आला. पण काही धागेदोरे मिळत नव्हते अखेर मोबाईल टॉवरच्या नेटवर्कच्या सहाय्याने त्यांचे लोकेशन तपासून माथेरानमधील सह्याद्री मित्र आपत्कालीन सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने शारलोट तलाव दरी, इको पॉइंट दरी येथे सर्च ऑपरेशन सुरू केले. जोरदार पाऊस त्यात धुके असताना देखील या संस्थेने दरीमध्ये तपास सुरू केला. दि.१४ रोजी या दोन्ही दरी पालथ्या घातल्यानंतर १५ रोजी त्यांनी लुईसा पॉईंट दरी तपासण्याचे काम हाती घेतले.

संस्थेचे अध्यक्ष वैभव नाईक, सुनील कोळी, अमित कोळी, चेतन कळंबे, उमेश मोरे, महेश काळे, सुनील ढोले, अक्षय परब, धीरज वालेंद्र, रुग्णवाहिका चालक अमोल सपकाळ व अजिंक्य सुतार तसेच येथील स्थानिक गोविंद झोरे, दर्शन सावंत व हशाच्या पट्टी या



आदिवासी गावातील सुरेश पारधी यांनी पूर्ण दरी तपासणीस सुरुवात केली. अखेर लुईसा पॉईंट येथील लायन्स हेड या टापूच्या खाली या दोघांचे शव आढळून आले होते. पण धुके आणि पावसामुळे ते शव आणण्यास व्यत्यय आला होता. अखेर १६ जुलैला रात्री २ वाजता हे शव दरीतून बाहेर काढण्यात यश आले.

या निस्वार्थी कामाची दखल घेत भोगटे परिवाराने सह्याद्री रेस्क्यू टीमला एक लाखाची मदत देऊ केली. याचा धनादेश दि.१३ रोजी दुपारी २ वाजता येथील उपविभागीय पोलीस अधिकारी टेळे यांच्या आदेशाने सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश गिरी तसेच पोलीस कर्मचारी वृंद यांच्या हस्ते माथेरान पोलीस ठाण्याच्या प्रांगणात देण्यात आला.

याबाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांनी सह्याद्री रेस्क्यू टीमची प्रशंसा करत कोणाताही मोबदला मिळत. कोणतेही सुख सुविधा नसताना नायलॉन दोराच्या सहाय्याने हे धाडसी काम करणाऱ्या येथील तरुणांना धन्यवाद दिले. तर सह्याद्री मित्र आपत्कालीन सामाजिक संस्थेच्या सदस्यांचा विमा काढण्याचा मनस यावेळी अनिल सोसाने यांनी बोलून दाखविले तर संस्थेच्या सदस्यांनी भोगटे परिवाराचे आभार मानले.

# आजपासून नवी मुंबई वाशीत महालक्ष्मी सरस -2024 चे आयोजन

**अक्षराज : जे.के पोळ**

**दि.१३, वाशी (नवी मुंबई) :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) च्या वतीने नवी मुंबईत वाशी येथील सिडको एक्झीबिशन सेंटर या ठिकाणी दि. १४ ते २५ डिसेंबर, २०२४ या कालावधीत राज्यस्तरीय महालक्ष्मी सरस प्रदर्शन-२०२४ चे भव्यदिव्य आयोजन करण्यात येत आहे. अशी माहिती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रुचेश जयवंशी, यांनी दिली आहे. ग्रामीण भागातील महिलांना स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून संघटित करुन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी निर्माण केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून व्यवसायवृध्दी व्हावी असा या प्रदर्शनाचा उद्देश आहे. महालक्ष्मी सरसचे नवी मुंबईतील हे दुसरे वर्ष असून, मागील वर्षी सरसला नवी मुंबईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. त्याप्रमाणे या वर्षी सुध्दा 'महालक्ष्मी सरस' वाशी येथील सिडको एक्झीबिशन सेंटर या ठिकाणी भरविण्यात येत असल्याने नवी मुंबईकरांना या प्रदर्शनाचा लाभ घेता येणार आहे. 'महालक्ष्मी सरस प्रदर्शन' एक अत्यंत नावीन्यपूर्ण आणि ग्रामीण संस्कृती शहरापर्यंत पोहोचविण्याचे अनोखे व्यासपीठ आहे.

या राज्यस्तरीय प्रदर्शनामध्ये साधारण ४७५ स्टॉल आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील ३७५ आणि देशभरातून साधारण १०० स्टॉल लावण्यात येणार आहेत. प्रदर्शनात राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सुगरणींचे खमंग आणि रुचकर शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थांचे ७५ स्टॉलचे मिळून भव्य असे फूड कोर्ट असणार आहे. या प्रदर्शनात अनेक प्रकारच्या कलाकुसर, हातमागावर तयार केलेले कपडे, वुडन क्राफ्ट, बंजारा आर्ट, वारली आर्ट च्या वस्तू असणार आहेत. याशिवाय महिलांच्या आकर्षणाच्या अनेक प्रकारचे दागिने, लाकडी खेळणी, इतर राज्यातील दुर्मिळ वस्तूंची रेलचेल या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहे. मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि पनवेल शहरातील नागरिकांना प्रदर्शनाचा आरामदायी अनुभव घेता यावा.

याकरिता संपूर्ण प्रदर्शन वातानुकूलित असणार आहे. त्याचप्रमाणे सहकुटुंब भेट देणाऱ्या कुटुंबांचा विचार करून लहान मुलांना खेळवाडी (प्ले एरिया) उभारण्यात आला आहे. या प्रदर्शनातून मोठ्या प्रमाणात विक्री होऊन ग्रामीण महिलांच्या कर्तृत्वाला हातभार लागावा. यासाठी प्रदर्शनाला भेट देऊन शुद्ध खात्रीच्या वस्तू आणि पदार्थांची खरेदी करावी, नवी मुंबई आणि जवळच्या परिसरातील नागरिकांनी या प्रदर्शनाचा भरभरुन लाभ घ्यावा. असे आवाहन उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रुचेश जयवंशी यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# भोकर तालुक्यातील सकल मातंग समाजाची मागणी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.१३, नांदेड :** परभणी येथील विश्व भूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर संविधान शिल्पाची विटंबना करणाऱ्या आरोपीवर कठोरातील कठोर कारवाई करण्यात यावी. यासाठी तालुक्यातील सकल मातंग समाजाच्यावतीने तहसीलदार भोकर यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे. परभणी शहरातील रेल्वे स्टेशन व जिल्हाधिकारी कार्यालय परिसरामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य-दिव्य पुतळा असुन त्या पुतळ्या समोरच भारतीय संविधानाचे प्रतिकात्मक शिल्प एका काचेच्या फ्रेम मध्ये सुरक्षीत ठेवण्यात आले होते. दि.१० डिसेंबर रोजी एका पवार नामक माथेफिरूकडून त्या काचेच्या फ्रेममध्ये ठेवलेल्या संविधान शिल्पास दगड मारून फोडण्यात आले. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर देखील दगड मारुन विटंबना केली गेली आसल्याने सबंध संविधान प्रेमी, आंबेडकरवादी अनुयायांच्या भावना दुखावल्या गेल्या असुन असे कृत्य करणाऱ्या माथेफिरूविरूद्ध व त्याच्या पाठीमागे असलेले आदर्श डोके शोधून त्यांच्यावर कठोरातील कठोर कारवाई करावी. जेणे करून भविष्यात असे कृत्य करण्याची कुणाची मानसिकता होणार नाही. या निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी, पोलिस निरीक्षक, यांनाही देण्यात आल्या असून निवेदनावरज्येष्ठ समाजसेवक उत्तम बाबळे, अण्णा महूरकर , सखाराम मोरे, के एम गोणेकर ,संग्राम वाघमारे सखाराम वाघमारे, पत्रकार कमलाकर बरकमकर, बालाजी टिकेकर साहेबराव वाहुळकर, पत्रकार गजानन गाडेकर, नागेश गायकवाड देवराव मनपूर्वे, बाळू गायकवाड, आदी प्रमूख समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मुकूटबन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : राजू गागरे**



**दि.१२, झरी (यवतमाळ) :** मुकूटबन येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनमध्ये नुकताच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सकाळी ठिक.८ वाजता अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी भवनाचे अध्यक्ष देवंतवार यांनी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन केले. त्यानंतर सामुहिक बुद्ध वंदना, त्रिशरण, पंचशील घेऊन या महामानवाला विनम्र अभिवादन करण्यात आले. आणि सायंकाळी ७.३० वा. मुकूटबन पोलीस ठाण्याचे ठाणेदार व पोलीस शिपाई यांच्या सुरक्षेत महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'कँडल मार्च' काढण्यात आला.

अशा प्रकारे ज्ञानाच्या या अथांग महासागरास कँडल मार्च ने विनम्र अभिवादन करण्यात आले. मोजू तरी कशी उंची तुझ्या कर्तूत्तावाची, तू जगाला शिकविली व्याख्या, माणसातल्या माणुसकीची. तू देव नव्हतास, तू देवदूतही नव्हतास, तू मानवतेची पुजा करणारा खरा महामानव होतास. बा भिमा, बा भिमा.... यावेळी सर्व समाज बांधव आणि भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# थोडक्यात

## रिक्षामध्ये विसरलेली बॅग पोलिसांनी केली परत

**अक्षराज : भानुदास गायकवाड**



**दि.१२, कल्याण (ठाणे) :** महात्मा फुले चौक पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने एका ७८ वर्षीय नागरिकाला हरवलेली मौल्यवान बॅग परत करून नागरिकांचे विश्वास पात्र ठेवले आहे. पिशोरीलाल चरणदास शर्मा (वय ७८ वर्षे), योगिधाम येथील रहिवासी, दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी योगिधाम येथून कल्याण स्टेशनकडे रिक्षाने प्रवास करीत होते. कल्याण स्टेशन येथे पोहोचल्यावर त्यांना लक्षात आले की, त्यांची बॅग रिक्षामध्ये विसरली आहे. बॅगमध्ये अडीच तोळे सोन्याचा महालक्ष्मी हार व इतर मौल्यवान वस्तू होत्या. पिशोरीलाल यांनी महात्मा फुले चौक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती. प्रॉपर्टी मिसिंग क्रमांक २०२७/२०२४ नोंदवून तपास सुरू करण्यात आला. पोलीसांनी सीसीटीव्ही फुटेजची मदत घेतली आणि तांत्रिकदृष्ट्या तपास करून संबंधित रिक्षाचा शोध घेतला. तपास पथकातील अधिकाऱ्यांनी अवघ्या काही दिवसांत बॅग सुरक्षितपणे शोधून काढली आणि पिशोरीलाल यांना परत केली. बॅग परत मिळाल्यानंतर पिशोरीलाल यांनी पोलीसांचे आभार मानले.

महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याच्या या तात्काळ आणि उत्कृष्ट कामगिरीमुळे नागरिकांमध्ये पोलीस दलाविषयी आदर आणि विश्वास आणखी दृढ झाला आहे. पोलीसांनी अशा प्रकारची तत्परता दाखवून केवळ हरवलेल्या मालमत्तेचा शोध घेतला नाही तर नागरिकांच्या सुरक्षेविषयी पोलीस दल किती सजग आहे, हे ही सिद्ध केले आहे.

## एम पूर्व विभागात बाल सभा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.१२, मुं.उपनगर :** दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजी समाज कल्याण केंद्र शिवाजी नगर गोवंडी या ठिकाणी चाईल्ड सेफ्टी फोरम अंतर्गत विविध एम पूर्व विभागांतील संस्था, संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने बाल सभा हा मुलांच्या अधिकार बाबत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. एम पूर्व विभागांतील विविध वस्त्यातील मुलांनी एकत्रित येवून आपल्या वस्तीतील समस्या या विचार मंचावर मांडाव्यात आणि शासकीय व निम शासकिय लोकांनी, अधिकाऱ्यांनी या प्रश्नावर तोडगा काढावा व प्रत्येक मुलांच्या अधिकार सुरक्षित आहेत. याची खात्री करुन द्यावी. त्यानिमित्ताने मानखुर्द, गोवंडी विभागातील विविध मुलांनी, संस्थांनी यां कार्यक्रमात सहभाग दाखवून मुलांनी प्रश्नावर भाष्य केले. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून साळुंखे, निर्भया पथक, शिवाजी नगर पोलीस ठाणे, समीक्षा सक्रे, रुकसाना सिद्दीकी.मा.नगरसेविका आणि बाल संरक्षण समिति अध्यक्ष सौमिता चाईल्ड राईट अँड यू, अंगणवाडी प्रतिनिधी सविता हेंडवे संस्थेच्या प्रतिनिधी नसरीन शेख बाल साथी इकरा, जानवी आणि विविध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

ह्या कार्यक्रमाची रूपरेषा संतोष सुर्वे, निमंत्रक, चाईल्ड सेफ्टी फोरम यांनी मांडली. विविध सामाजिक संस्थेच्या माध्यमातून मुलांनी नाटकं, गाणी, खेळ या माध्यमातुन मुलांचे अधिकार, नशा, शिक्षणं, प्रभाग क्र.१३५ मध्ये मनपा शाळा नसल्याने मुलांची शिक्षणासाठी होणारी हेळ सांड तसेच मागील ३ वर्षापासुन महानगरपालिका च्या निवडणुका न झाल्याने बाल संरक्षण समितीची सद्य स्थिती आणि मुलांची सुरक्षा यावर मांडणी करुन प्रत्येक मूल शिक्षित आणि सुरक्षित कसे राहील यावर विवीध अधिकारी आणि संस्था प्रतिनिधी नी मार्गदर्शन केले. बाल संरक्षण समिती वॉर्ड स्तरावर कशा कार्यान्वित होतील. यावर चर्चा आणि मागणी करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लारा आणि शिमोन, शाकीर बागवान यांनी केलं.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश भवरे यांनी मांडली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आणि सांगता समारंभ विनोद हिवाळे यांनी केले. विशेष सहकार्य युवा संस्था जनजागृती विद्यार्थी संघ संकल्प संस्था, अपणालय, प्रथम, प्रेरणा, सपोर्ट, कारुण्य ट्रस्ट, लोकसेवा संगम, जीवनधारा, क्राय, कोरो इंडीया बाल अधिकार संघर्ष संघठन, फ्रेंड्स फाऊंडेशन, संकल्प सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गातील विद्यार्थी चतअडडघ यांचे लाभले.

## टाकळीढोकेश्वर येथे दत्त जयंती निमित्त विविध कार्यक्रम

### ह.भ.प यशवंत महाराज यांचे जाहीर किर्तन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील आदर्श गाव टाकळीढोकेश्वर येथिल श्री दत्त मंदिर येथे वै.ह.भ.प योगीराज महाराज गुळवणी, वै.विठ्ठलबाबा यांच्या कृपाशीर्वादाने व वै. ह.भ.प गुरुवर्य बबन महाराज पायमोडे यांच्या प्रेरणेने दरवर्षी प्रमाणे यंदाही शनिवार, दि.१४ डिसेंबर रोजी दुपारी ४ ते ६ वाजता दत्त भजनी मंडळ व टाकळीढोकेश्वर ग्रामस्थांच्या सहकार्याने श्री दत्त जन्मोत्सव सोहळा साजरा होत आहे. त्यानिमित्ताने श्री दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्था, ढवळपूरी येथील ह.भ. प यशवंत महाराज थोरात यांचे दत्त जन्माचे सुश्राव्य किर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१४ डिसेंबर रोजी पहाटे ४ वा काकडा भजन, सकाळी ८ वाजता विष्णु सहस्त्रनाम, सकाळी १० वा. गाथा भजन व अन्नदान आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दत्त जयंतीचे यावर्षी चे ५४ वे वर्ष आहे.

या निमित्ताने मंदिरावर व मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे. सायंकाळी ४ ते ६ या वेळेत ह.भ.प यशवंत महाराज थोरात यांचे दत्त जन्माचे किर्तन होईल व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तर किर्तन यासह विविध धार्मिक कार्यक्रमांचा परिसरातील भाविक भक्तांनी व ग्रामस्थांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, सेवा सोसायटीचे चेअरमन व संचालक, समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर तसेच सप्ताह कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.